Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357 Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P002
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Nov'25
Issue–XI(I), Volume–XIII

# चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन

**संशोधनकर्ता:- अंबादास भगवान तिरनकर**
Email ID:-ambadastirankar@gmail.com
**मार्गदर्शक डॉ. आशिष कृष्णाजी महातळे**
संशोधन केंद्र - जनता महाविद्यालय, चंद्रपूर

**सारांश:-**

मानवाच्या मूलभूत गरजा जसे की अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य यांच्या पूर्ततेसाठी आर्थिक क्रिया आवश्यक असतात. महाराष्ट्रामध्ये एकुण 45 आदिवासी जमाती असून या 45 जमातींपैकी महाराष्ट्रामध्ये कोलाम, कातकरी व माडीया गोंड या जमातीला केंद्रशासनाकडून आदिम जमातीचा दर्जा प्राप्त झालेला आहे. कोलाम ही चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम जमात असून, ती डोंगराळ आणि दुर्गम भागात वास्तव्यास आहे. त्यांच्या आर्थिक स्थितीवर परंपरागत शेती, मजुरी आणि वनउपज संकलन यांचा प्रभाव आहे. तसेच शेतीसाठी करण्यात येणारी बि-बियाणांची खरेदी, शेतामधील उत्पादीत मालाची विक्री, शेतीकरिता लागणारे कर्ज कुठून घेतात. त्यांचा कर्जाचा स्त्रोत कोणता आहे व घेतलेल्या कर्जाचे नियमित परतफेड करतात किंवा नाही. या रिसर्च पेपरमध्ये कोलाम जमातीच्या आर्थिक क्रियांचे विश्लेषण, त्यांच्या उत्पन्नाचे स्रोत, शेतीचे स्वरूप, आणि आर्थिक आव्हानांचा अभ्यास केला आहे.

**बीजशब्द:-** आदिम जमात, अधिसुचित, आर्थिक स्थिती, व्यवसाय, उत्पन्नाचा स्त्रोत, कर्जपुरवठा, सिंचनाचा स्त्रोत, परतफेड, शेतीचे प्रमाण इ.

**प्रस्तावना:-**

चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्रातील विदर्भ या प्रांतातील महत्वाचा जिल्हा असून या जिल्ह्याला गोंड राजाचा मोठा इतिहास लाभलेला आहे. चंद्रपूर जिल्ह्याला औद्योगीक जिल्हा तसेच गोंड राजाचा जिल्हा म्हणून सुध्दा ओळखल्या जाते. चंद्रपूर जिल्हयामध्ये एकुण 15 तालुके असून सन 2011 च्या जणगणनेनुसार चंद्रपूर जिल्ह्याची एकुण लोकसंख्या ही 22,04,907 आहे. त्यापैकी अनुसुचित जमातीची लोकसंख्या ही 3,89,441 म्हणजेच एकुण लोकसंख्येच्या 17.67 टक्के आहे. तर अनुसुचित जमातीच्या एकुण लोकसंख्येपैकी कोलाम लोकसंख्या ही 7995 आहे. कोलाम जमात ही चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकुण 68 गुडा/पाडा/गावामध्ये वास्तव्यास आहे.

महाराष्ट्रात एकुण 45 मुख्य आदिवासी जमाती वास्तव्य करतात. आदिवासी जमाती मध्ये अशा काही जमाती आहेत की त्या इतर आदिवासी जमातीच्या तुलनेमध्ये अत्यंत मागसलेल्या आहेत. त्यांच्या या मागासलेपणामुळे शासनाने त्यांचे वर्गीकरण अतिमागास / आदिम म्हणजेच 'प्रिमिटिव्ह' (Primitive) आदिवासी म्हणून केलेले आहे. केंद्रशासनाने अधिसुचित केल्यानुसार महाराष्ट्रामध्ये कोलाम, कातकरी आणि माडीया गोंड या तीन आदिवासी जमाती आदिम (Primitive) जमाती म्हणुन वर्गीकृत केलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये कोलाम जमात हि मुख्यत: यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा व नांदेड या जिल्ह्यात आढळतात. तर कातकरी जमात ही रायगड व ठाणे या जिल्ह्यात दिसुन येतात आणि माडीया गोंड ही जमात प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यात वास्तव्यास आहे.

कोलाम हे द्रविड वंशाचे आहेत. काही अभ्यासकांच्या मते, 'ते दक्षिण भारतातील निलगिरी पर्वतावरील मूलनिवासी असावेत.' कोलाम जमात ही स्वतंत्र जमाती असुन त्या जमातीमध्ये उपजाती नाहीत. या जमातीचे खरे नाव 'कोलाम' आणि 'कोलावन' असे आहे. यवतमाळ जिल्ह्यात इतर लोक कोलामांना 'नाईक' म्हणतात. आदिवासी जमातीच्या अनेक बोलीभाषा असुन कोलामांची स्वतंत्र अशी कोलामी बोलीभाषा आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने कोलाम जमात ही कोरपना, जिवती, राजुरा व वरोरा या चार तालुक्यामध्ये वास्तव्यास आहे. कोलाम जमात ही सर्वसामान्य लोक राहत असलेल्या गावामध्ये राहत नाही तर त्या गावापासून अर्धा ते एक किलोमिटर अंतरावर आपली स्वतंत्र वस्ती बसवितात. त्याला कोलाम गुडा/पाडा असे म्हणतात. कोलाम जमाती ह्या डोंगराळ टेकडी भागामध्ये वास्तव्य करीत आहे आणि त्यांची शेती सुध्दा डोंगराळ दगडी भागात आहे त्यामध्ये माती कमी आणि दगड जास्त अशी परिस्थिती आहे त्यामुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न अल्प आहे.

केंद्र सरकारकडून आदिम जमातीच्या विकासाच्या दृष्टीने अनेक योजना राबविण्यात येत आहे त्यामध्ये महत्वाची योजना म्हणजेच "आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम" ही आहे. या योजनेअंतर्गत आदिम जमातीकरिता विशेष निधीचे

प्रावधान आहे. परंतु आजही कोलाम जमातीचा आर्थिक, सामाजिक तथा शैक्षणिक विकास झालेला नाही त्यामुळे ही जमाती अतिशय मागासलेली आहे. आजही उच्च शिक्षणामध्ये कोलामांची संख्या बोटावर मोजण्या इतपत आहे.

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा आहे त्यासोबतच शिक्षण आणि आरोग्य या सुद्धा गरजा मानवासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मानव प्रगत असो किंवा अप्रगत प्रत्येक माणसाला गरजा असतातच. त्यामुळे मणुष्य आपल्या गरजा पूर्ण करण्याकरिता सतत प्रयत्न करीत असतो. परंतु गरजा ह्या अनंत असल्याने एक गरज पूर्ण झाली की दुसरी गरज निर्माण होतात. त्यामुळे गरजा कधीही न संपणाऱ्या आहेत. गरजा ह्या अनंत असताना त्या गरजा पूर्ण करण्याची साधने मात्र मर्यादित स्वरूपाची आहे. म्हणून मानवाला आपल्या संपूर्ण गरजा पूर्ण करणे शक्य झालेले नाही. अमर्यादित गरजा व मर्यादित साधने यांचा मेळ घालण्याच्या प्रयत्नातूनच आर्थिक प्रश्न निर्माण झालेले आहेत. व्यक्तीला गरजा पूर्ण करण्याकरिता आर्थिक प्रश्न सोडवावे लागतात. आर्थिक प्रश्न सोडविण्याकरिता आर्थिक क्रिया सुद्धा कराव्या लागतात. आधुनिक काळातील मानवाच्या गरजा ह्या अमार्यादित स्वरुपाच्या आहे. गरजा ह्या काळानुसार व समाजा नुसार बदलत्या असताना दिसून येते. त्या गरजांमधूनच मूलभूत गरजा कमीत कमी वेळेमध्ये व कमीत कमी श्रमांमध्ये पूर्ण करावयाच्या उद्देशाने मानवी संबंध व मानवी प्रयत्न नियमित करणे म्हणजेच अर्थव्यवस्था होय.

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीतील लोक हे आर्थिकरित्या मागास असले तरी त्यांना सुद्धा आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक प्रकारच्या आर्थिक क्रिया कराव्याच लागतात. चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीच्या गरजा ह्या प्रगत असलेल्या समाजापेक्षा अत्यंत कमी असल्याचे आहे. कारण शिक्षणामुळेच मानवाच्या विचारसरणीत वाढ होते त्यामुळे त्यांच्या राहणीमानाच्या दर्जामध्ये वृध्दी होते. परंतु कोलाम जमातीमध्ये शिक्षणाचा पाहिजे तसा प्रसार न झाल्याने त्यांचा सुशिक्षित समाजापेक्षा राहणीमानाचा दर्जा खालावलेला दिसून येतो. तरीसुद्धा त्यांना आपल्या गरजा पूर्ण करण्याकरिता अनेक अडचणींचा सामना करावा लागतो त्यामुळे त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीचा प्रमुख व्यवसाय हा शेती असून त्यांची शेती ही डोंगराळ भागात असल्याने त्या ठिकाणी जमीनीपेक्षा दगडाचे प्रमाण जास्त आहे. म्हणून त्यांच्या शेतातून मिळणारे उत्पन्न अत्यल्प आहे. तसेच ते करत असलेली शेती सुद्धा हंगामी स्वरूपाची असल्यामुळे हंगाम संपल्यानंतर त्यांना उत्पन्न मिळत नाही. त्यामुळेच शेतीसोबतच कोलाम जमात ही वेगवेगळे मजुरीचे काम सुध्दा करताना दिसून येते. वनांमधील वनउपज वस्तू गोळा करून त्याची बाजारात विक्री सुद्धा करत असतात. काही काळापूर्वी कोलाम जमातीतील लोक मोहफुलापासून दारू तयार करत होते. परंतु शासनाच्या कडक कारवाईमुळे हा सुद्धा त्यांचा उत्पन्नाचा स्त्रोत बंद झाल्याचे दिसून येते.

**उद्दिष्टे**

1. कोलाम जमातीच्या आर्थिक क्रियांचे स्वरूप समजून घेणे.
2. त्यांच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत आणि वार्षिक उत्पन्नाचे विश्लेषण करणे.
3. शेतीच्या स्वरूपाचे, सिंचन सुविधांचे आणि पूरक व्यवसायांचे मूल्यमापन करणे.
4. कर्ज, वन्य प्राण्यांमुळे होणारे नुकसान आणि रासायनिक खतांचा वापर यांचा आर्थिक परिणाम समजून घेणे.

**संशोधन पद्धती**

या संशोधनासाठी प्राथमिक साधनांचा ज्यात मुलाखत अनुसुची, निरीक्षणे तसेच दुय्यम तथ्य संकलन साधनांचा वापर केला आहे. यात संदर्भ ग्रंथ, पुस्तके, इंटरनेट जाळे इत्यादींचा समावेश केला आहे. हा अभ्यास चंद्रपूर जिल्ह्यातील 386 कोलाम कुटुंबांच्या प्राथमिक सर्वेक्षण डेटावर आधारित आहे. मुलाखत अनुसुची द्वारे डेटा संकलित केला गेला असून, सांख्यिकीय विश्लेषणाद्वारे परिणामांचे मूल्यमापन केले आहे. तक्ते आणि आलेख यांचा उपयोग डेटाचे वर्गीकरण आणि विश्लेषणासाठी केला गेला आहे.

**माहितीचे विश्लेषण**

**कोलाम जमातीच्या व्यवसायाचे स्वरूप**:-

चंद्रपूर जिल्ह्यातील कोलाम जमातीचा शेती हा या जमातीचा मुख्य व्यवसाय असून शेती सोबतच ते मजुरीचे काम सुद्धा करताना दिसून येते. शेती तसेच मजुरी हे दोन्ही घटक हंगामी स्वरूपाचे आहे. त्यामुळे काही प्रमाणात वनोपज वस्तू गोळा करून त्याचे बाजारामध्ये विक्री करताना दिसून येते. परंतु यावर त्यांचा उदरनिर्वाह पूर्ण होताना दिसून येत नाही. व्यवसाय हे दोन प्रकारचे असतात एक पारंपरिक व्यवसाय आणि दुसरा आधुनिक व्यवसाय.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P002

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Nov'25
Issue–XI(I), Volume–XIII

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीच्या कुटुंबाचे व्यवसायानुसार वर्गीकरण पुढील प्रमाणे करण्यात आले आहे.

तक्ता क्र. 1.1


आदिम कोलाम कुटंबे करित असलेल्या व्यवसायाच्या स्वरुपाची माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | व्यवसायाचे स्वरूप | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पारंपारिक | 386 | 100 |
| 2 | आधुनिक | 0 | 0 |
| एकुण | | 386 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.1 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमाती करित असलेल्या व्यवसायाच्या स्वरूपासंबंधी माहिती दर्शविलेली आहे. वरिल तक्त्यातील माहितीनुसार कोलाम कुटुंबातील एकूण 386 कुटुंबापैकी 386 कुटुंब हे पारंपारिक व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले. आणि त्यांचे प्रमाण हे 100% आहे. कोलाम कुटुंबामध्ये आधुनिक व्यवसाय करणारे एकही कुटुंब आढळून आले नाही.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश कोलाम कुटुंबाच्या व्यवसायाचे स्वरूप हे पारंपारिक आहे.




**आलेख क्र. 1.1 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम जमातीतील कुटुंबाच्या व्यवसायाच्या स्वरुपाचे वर्गिकरण**

## कुटुंबातील उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत:-

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमात आपला उदरनिर्वाह प्रामुख्याने कोणत्या साधनाद्वारे पार पाडतो. त्यांचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत कोणता आहे. याबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे

तक्ता क्र. 1.2

आदिम कोलाम कुटुंबातील उत्पन्नाचा मुख्य स्त्रोताबाबत माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | उत्पन्नाचा स्त्रोत | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | शेती | 193 | 50.00 |
| 2 | मजुरी | 191 | 49.48 |
| 3 | नोकरी | 02 | 0.52 |
| 4 | इतर | 0 | 0 |
| एकुण | | 386 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**


वरील तक्ता क्रमांक 1.2 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीतील कुटुंबाच्या उत्पन्नाच्या मुख्य स्त्रोतांसंबंधी माहिती दर्शविण्यात आलेली आहे. तक्त्यामध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार अध्ययन क्षेत्रातील एकूण 386 कुटुंबापैकी ज्या कुटुंबांचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत हा शेती आहे असे एकूण 193 कुटुंब आढळून आले त्यांचे प्रमाण 50% आहे. कोलाम जमातीतील ज्या कुटुंबाचा मुख्य स्त्रोत हा मजुरी आहे असे एकूण 191 कुटुंब असून त्यांचे प्रमाण 49.48% आहे. तर नोकरी हा

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P002

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Nov'25
Issue–XI(I), Volume–XIII

उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे असे फक्त 2 कुटुंबे आढळून आले. त्यांचे प्रमाण 0.52% आहे. तर इतर उत्पन्नाचा स्त्रोत असणारे एकही कुटुंब आढळून आलेले नाही.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाचे आधारे असे निदर्शनास येते की चंद्रपूर जिल्ह्यातील बहुतांश कुटुंबांचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा शेती असून त्यासोबतच मजुरी हा सुद्धा त्यांचा उत्पन्नाचा महत्त्वाचा स्त्रोत असल्याचे दिसून येते.




आलेख क्र. 1.2 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम जमातीतील कुटुंबाच्या मुख्य स्त्रोतासंबंधीचे वर्गिकरण

## कोलाम कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न:-

कुटुंबाच्या उत्पन्नावरच कुटुंबातील सदस्यांचे जीवनमान अवलंबून असते.. ज्या कुटुंबाचे उत्पन्न जास्त असेल त्या कुटुंबातील गरजा त्या उत्पन्नातून पूर्ण होऊ शकते परंतु ज्या कुटुंबाचे उत्पन्न अत्यल्प असेल त्या कुटुंबातील गरजा पूर्ण होताना दिसून येत नाही. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबाचे विविध साधनांद्वारे प्राप्त झालेले वार्षिक उत्पन्न किती आहे. याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. 1.3

आदिम कोलाम कुटुंबाचे वार्षिक उत्पन्नासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता


| अ.क्र. | वार्षिक उत्पन्न | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 50,000 पर्यंत | 318 | 82.38 |
| 2 | 51,000 ते एक लाख | 67 | 17.36 |
| 3 | एक ते दोन लाख | 1 | 0.26 |
| 4 | दोन लाखापेक्षा जास्त | 0 | 0.00 |
| एकुण | | 386 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.3 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील एकूण वार्षिक उत्पन्नासंबंधी माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार अध्ययन क्षेत्रातील एकूण 386 कुटुंबापैकी ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 50,000/- पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी आहे असे एकूण 318 कुटुंब आढळून आले आणि त्यांचे प्रमाण 82.38% टक्के आहे. ज्या कुटुंबाचे उत्पन्न 51,000 ते एक लाख च्या दरम्यान आहे असे एकूण 67 कुटुंब असुन त्यांचे प्रमाण हे 17.36% असल्याचे आढळून आले. तसेच कोलाम कुटुंबातील ज्यांचे उत्पन्न एक लाख ते दोन लाख यादरम्यान आहे असे केवळ 01 कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण हे 0.26% आहे.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश कुटुंबातील एकूण वार्षिक उत्पन्न हे 50,000/- हजार व त्यापेक्षा कमी आहे. यावरूनच असे दिसून येते की चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील आर्थिक स्थिती ही अतिशय नाजूक व बिकट स्वरुपाची आहेत. या उत्पन्नामधून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह पूर्ण होतना दिसून येत नाही.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P002
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Nov'25
Issue–XI(I), Volume–XIII




आलेख क्र. 1.3 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंबाचे वार्षिक उत्पन्नाचे वर्गिकरण

**कोलाम कुटुंबाकडे असणाऱ्या शेतीचे प्रमाण:-**

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमात प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असणारी जमात आहे. त्यासोबतच ते मजुरी सुद्धा करताना दिसून येते. त्यांची शेती ही प्रामुख्याने कोरडवाहू स्वरूपाची आहे. शेतीमध्ये जमीनीच्या प्रमाणापेक्षा दगडांचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास येते. तक्ता क्र. 1.3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे आदिम कोलाम कुटुंबाती एकुण 193 कुटुंबाकडे शेती असल्याचे दिसून येते. त्यांच्याकडे असलेल्या शेतीच्या प्रमाणाबाबत माहिती खालील तक्त्यामध्ये माहिती दर्शविलेली आहे.

तक्ता क्र. 1.4


आदिम कोलाम कुटुंबाकडील शेतीच्या प्रमाणासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | शेतीचे प्रमाण | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भुमिहीन | 192 | 49.74 |
| 2 | 1 हेक्टर पर्यंत | 117 | 30.31 |
| 3 | 1 ते 2 हेक्टर पर्यंत | 61 | 15.80 |
| 4 | 2 हेक्टरपेक्षा जास्त | 16 | 4.15 |
| एकुण | | 386 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.4 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीकडे उपलब्ध असलेल्या शेतीसंबंधी माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, ज्या कुटुंबाकडे काहीच शेती नसून ते भुमिहीन आहे. असे एकूण 192 कुटुंब आहे त्यांचे प्रमाण 49.74% आहे. तर ज्या कुटुंबाकडे एक हेक्टर पर्यंत शेती आहे असे एकूण 117 कुटुंब आहे. त्यांचे प्रमाण हे 30.31% आहे. ज्या कुटुंबाकडे असणारी शेती ही एक ते दोन हेक्टर च्या मर्यादित आहे असे एकूण 61 कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण हे 15.80% आहे. तसेच ज्या कुटुंबाकडे असणारी शेती ही दोन हेक्टर पेक्षा जास्त आहे असे एकूण 16 कुटुंब असून त्यांचे प्रमाण 4.15% असल्याचे दिसून येते.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश कोलाम कुटुंबाकडे शेती नसल्याने ते भुमिहीन असल्याचे आहे. आणि ज्या कुटुंबाकडे शेती उपलब्ध आहेत त्यामध्ये एक हेक्टर पर्यंत शेती असणाऱ्यांचे प्रमाण हे अधिक असल्याचे आढळते.




आलेख क्र. 1.4 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंबाकडील उलपब्ध शेतीच्या प्रमाणाबाबत वर्गिकरण

**शेतामध्ये सिंचनाची सोय:-**

शेतकऱ्यांना आपल्या शेतीचे उत्पन्नामध्ये वाढ करावयाची असल्यास त्यांच्या शेतामध्ये सिंचनाची सोय असणे आवश्यक आहे. जर शेतकऱ्यांच्या शेतामध्ये मुबलक प्रमाणामध्ये सिंचनाची सुविधा असल्यास ते शेतकरी एका वर्षामध्ये दोन हंगामध्ये उत्पन्न घेऊ शकते व त्यामाध्यमातून ते आपल्या उत्पन्नामध्ये वाढ घडवून आणू शकते. वरील तक्ता क्रमांक 1.4 मध्ये दर्शविल्यानुसार अध्ययन क्षेत्रातील एकूण 194 कुटुंबाकडे शेती असून त्या कुटुंबापैकी किती कुटुंबाच्या शेतामध्ये सिंचनाची सोय उपलब्ध आहे याबाबत खालील तक्त्यामध्ये माहिती दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.5


आदिम कोलाम कुटुंबाकडील शेतीमध्ये असणाऱ्या सिंचनाच्या सुविधेबाबत माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | सिंचनाची सुविधा | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | आहे | 56 | 28.87 |
| 2 | नाही | 138 | 71.13 |
| एकुण | | 194 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.5 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबाकडे असणाऱ्या सिंचनाच्या सोयीबाबत माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील माहितीवरून असे दिसून येते की ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सोय उपलब्ध आहे असे एकूण 56 शेतकरी असून त्यांचे प्रमाण 28.87% आहे. तर ज्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये सिंचनाची सोय उपलब्ध नाही असे एकूण 138 कुटुंब आहे आणि त्यांचे प्रमाण हे 71.13% आहे.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश कोलाम शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध नाही.




आलेख क्र. 1.5 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंबाकडील सिंचनाच्या सोयीचे वर्गिकरण

**सिंचनाकरिता उपलब्ध स्त्रोत:-**

तक्ता क्रमांक 1.5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकुण 194 शेतकऱ्यांपैकी केवळ 56 शेतकऱ्यांकडे सिंचनाची सोय उपलब्ध असल्याचे दर्शविण्यात आलेले आहे. आदिम कोलाम जमातीतील एकुण 56 शेतकऱ्यांपैकी कोणत्या शेतकऱ्यांकडे कोणत्या प्रकारचा सिंचनाच्या स्त्रोत उपलब्ध आहे याबाबत माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.6

आदिम कोलाम कुटुंबाकडील सिंचनाच्या स्त्रोतासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | सिंचनाचा स्त्रोत | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | विहीर | 54 | 96.43 |
| 2 | बोअर | 02 | 3.57 |
| 3 | तलाव | 0 | 0 |
| 4 | नदी / नाला | 0 | 0 |
| एकुण | | 56 | 100 |


**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.6 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील शेतकऱ्यांकडे उपलब्ध सिंचनाचा स्त्रोत याबाबत माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की आदिम कोलाम कुटुंबातील शेतकऱ्यांकडे विहीर हा सिंचनाचा स्त्रोत उपलब्ध असणारे एकुण 54 कोलाम शेतकरी आढळून आले असून त्यांचे प्रमाण हे 96.43% आहे. तर ज्या शेतकऱ्यांकडे बोअर किंवा बोरवेल हा सिंचनाचा स्त्रोत उपलब्ध आहे असे केवळ 2 शेतकरी आढळून आले. त्यांचे प्रमाण हे 3.57% आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांकडे तलाव आणि नदी किंवा नाला हा सिंचनाचा स्त्रोत उपलब्ध आहे असे एकही कोलाम कुटुंब आढळून आलेले नाही.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे दिसून येते की चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीच्या कुटुंबातील बहुतांश शेतकरी हे सिंचनाचा स्त्रोत म्हणून विहिरीचा उपयोग करताना दिसून येते.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P002

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Nov'25
Issue–XI(I), Volume–XIII




आलेख क्र. 1.6 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंबाकडील सिंचनाच्या उपलब्ध स्त्रोताचे वर्गिकरण

**शेतामध्ये घेण्यात येणारी पिके:-**

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीतील शेतकरी हे आपल्या शेतामध्ये कोणत्या प्रकारचे पिके घेतात याबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.7


आदिम कोलाम कुटुंब शेतामध्ये घेत असलेल्या पिकांसंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | कोलाम शेतकरी कुटंब घेत असलेली पिके | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भाजीपाला | 0 | 0 |
| 2 | कापुस / सोयाबीन | 193 | 99.48 |
| 3 | गहु/चना/ज्वारी | 1 | 0.52 |
| 4 | इतर | 0 | 0 |
| एकुण | | 194 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.7 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील जे शेतकरी शेती करत आहे ते त्यांच्या शेतामध्ये कोणत्या प्रकारचे पिके घेतात याबाबतची माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार कोलाम कुटुंबातील जे शेतकरी कापूस / सोयाबीनचे उत्पादन आपल्या शेतामध्ये घेतात असे एकूण 193 शेतकरी असून त्यांचे प्रमाण हे 99.48% आहे. तर गहू / चना / ज्वारी हे पिक घेणारे फक्त 1 शेतकरी कुटुंब आढळून आलेले आहे आणि त्यांचे प्रमाण हे 0.52% आहे. आदिम कोलाम जमातीतील भाजीपाला किंवा इतर पिके घेण्यात येणारी एकही शेतकरी कुटुंब आलेले नाही.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील शेतकरी प्रामुख्याने कापूस किंवा सोयाबीन हे पीक आपल्या शेतामध्ये घेताना दिसून येते.



Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P002
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Nov'25
Issue–XI(I), Volume–XIII

**आलेख क्र. 1.7 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम शेतकरी कुटुंबे घेत असलेल्या पिकांसंबंधीचे वर्गिकरण**

**आदिम कोलाम कुटुंबातील पूरक व्यवसाय**:-

आजच्या आधुनिक युगामध्ये शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये घट होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेती सोबतच एखादा पूरक व्यवसाय केल्यास त्यांच्या उत्पन्नामध्ये भर पडते. चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीत शेती या प्रमुख व्यवसाया व्यतिरिक्त कोणकोणते पूरक व्यवसाय करतात याबाबत खालीलप्रमाणे माहिती दर्शविलेली आहे.

तक्ता क्र. 1.8


आदिम कोलाम कुटुंबातील पुरक व्यवसायासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | पुरक व्यवसाय | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पशुपालन | 01 | 0.26 |
| 2 | कुक्कुटपालन | 2 | 0.52 |
| 3 | दुग्ध व्यवसाय | 0 | 0 |
| 4 | एकही नाही | 383 | 99.22 |
| एकुण | | 386 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.8 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील पूरक व्यवसायासंबंधी माहिती दर्शविण्यात आलेली आहे. अध्ययन क्षेत्रातील एकूण 386 कुटुंबापैकी पशुपालन हा पुरक व्यवसाय करणारे केवळ 01 कुटुंब आढळून आले यांचे प्रमाण 0.26% आहे. तर कुक्कुटपालन हा पुरक व्यवसाय करणारे फक्त 02 आदिम कोलाम कुटुंब आढळून आले असुन त्यांचे प्रमाण हे 0.52% दिसून येते. दुग्ध व्यवसाय हा पुरक व्यवसाय करणारे एकही आदिम कोलाम कुटुंब आढळून आलेले नाही. याऊलट कोलाम जमातीमधील एकही पूरक व्यवसाय न करणारे एकूण 383 कुटुंब आढळून आले आणि त्यांचे प्रमाण हे 99.22% असल्याचे दिसून येते.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील बहुतांश कुटुंबामध्ये कोणत्याही प्रकारचा पूरक व्यवसाय केल्या जात नाही.




**आलेख क्र. 1.8 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंबे करित असलेल्या पुरक व्यवसायाचे वर्गिकरण**

**शेतीची आधुनिक अवजारे:-**

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमातीतील शेतकरी कुटुंबे ही प्रामुख्याने पारंपारिक पद्धतीने शेती करताना आढळून येते. त्यामुळे आदिम कोलाम शेतकरी कुटुंब शेती करताना कोणत्या आधुनिक अवजारांचा शेतात उपयोग करतात याबाबत खालील तक्त्यामध्ये माहिती दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.9

आदिम कोलाम कुटुंब शेतात वापर करणाऱ्या आधुनिक अवजारासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | आधुनिक अवजारे | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P002


e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Nov'25
Issue–XI(I), Volume–XIII

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | ट्रॅक्टर | 24 | 12.37 |
| 2 | मळणी यंत्र | 0 | 0 |
| 3 | वरील दोन्ही | 0 | 0 |
| 4 | वापर न करणारे | 170 | 87.63 |
| | एकुण | 194 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.9 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम शेतकरी कुटुंबातील शेतीसाठी वापरत असलेल्या आधुनिक अवजारासंबंधी माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार कोलाम कुटुंबातील एकुण 194 शेतकरी कुटुंबांपैकी जे शेतकरी ट्रॅक्टर या आधुनिक अवजारांचा उपयोग करतात असे एकूण 24 कुटुंब आढळून आले. त्यांचे प्रमाण हे 12.37% आहे. तर मळणी यंत्राचा उपयोग करणारे एकही आदिम कोलाम शेतकरी कुटुंब आढळून आलेले नाही. याव्यतिरिक्त जे कोलाम शेतकरी कुटुंब आपल्या शेतामध्ये कोणत्याही प्रकारचा आधुनिक अवजारांचा वापर करत नाही असे एकुण 170 शेतकरी कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण हे 87.63% आहे.

वरील प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की चंद्रपूर जिल्हयातील आदिम शेतकरी कुटुंब बहुतांश प्रमाणामध्ये आपल्या शेतामध्ये कोणत्याही प्रकारच्या आधुनिक अवजारांचा उपयोग करताना दिसून येत नाही.




**आलेख क्र. 1.9 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंब शेतात वापर करणाऱ्या आधुनिक अवजारांचे वर्गिकरण**

## बि - बियाण्यांची खरेदी :

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील बहुतांश शेतकरी कुटुंब हे पारंपरिक पद्धतीने शेती करीत असतात. ते शेतकरी शेती करत असताना आपल्या शेतामध्ये जे उत्पादन घ्यावयाचे आहे त्या उत्पादित बि-बियाणांची खरेदी कुठून करतात याबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.10

आदिम कोलाम कुटुंब करत असलेल्या बि - बियाणांच्या खरेदी संबंधी माहिती दर्शविणारा तक्ता


| अ.क्र. | बि-बियाणांची खरेदी | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | कृषी केंद्रातून | 172 | 88.66 |
| 2 | घरची जुनी बियाणे | 1 | 0.52 |
| 3 | सरकारी योजनेतून | 0 | 0 |
| 4 | सावकाराकडून | 21 | 10.82 |
| | एकुण | 194 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.10 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम शेतकरी कुटुंब बि- बियाण्याची खरेदी कुठून करतात याबाबतची माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार बि-बियाणांची खरेदी कृषी

केंद्रातून करणारे एकूण 172 शेतकरी कुटुंब आढळून आले आणि त्यांचे प्रमाण हे 88.66% असल्याचे दिसून येते. तर जे शेतकरी कुटंब आपल्या घरी असलेल्या जुन्या बि-बियाणांचा उपयोग करतात असे केवळ 1 शेतकरी कुटुंब आढळून आले असुन त्यांचे प्रमाण हे 0.52% आहे. तर सरकारी योजनेमधून बि-बियाण्यांची खरेदी करणारे एकही कोलाम शेतकरी कुटुंब आढळून आलेले नाही. सावकारांकडून बि-बियाणांची खरेदी करतात असे एकूण 21 कोलाम शेतकरी कुटुंब आढळून आले असुन त्यांचे प्रमाण 10.82% आहे.

वरील प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम शेतकरी कुटुंब हे प्रामुख्याने शेतीसाठी लागणाऱ्या बि-बियाणांची खरेदी कृषी केंद्रामधूनच करताना दिसून येते.




आलेख क्र. 1.10 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंब करित असलेल्या बि-बियाणांच्या खरेदीचे वर्गिकरण

**शेतमालाची विक्री:-**

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम शेतकरी कुटुंब हे आपल्या शेतामध्ये कापूस, सोयाबीन अशी वेगवेगळे उत्पादने घेताना दिसून येते. त्यांच्या शेतामध्ये उत्पादित झालेल्या मालाची कोणत्या बाजारपेठेमध्ये विक्री करतात याबाबत खालील तक्त्यामध्ये माहिती दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.11


आदिम कोलाम कुटुंब करत असलेल्या उत्पादित मालाच्या विक्री संबधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | उत्पादित मालाची विक्री | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | सावकार | 67 | 34.54 |
| 2 | कृषी उत्पन्न बाजार समिती | 87 | 44.84 |
| 3 | खाजगी बाजारपेठ | 40 | 20.62 |
| 4 | आदिवासी विकास महामंडळ | 0 | 0 |
| एकुण | | 194 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.11 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबे आपल्या शेतातील उत्पादित मालाची विक्री कुठे करतात याबाबतची माहिती दर्शविण्यात आलेली आहे. आपल्या शेतातील उत्पादित मालाची विक्री सावकारांकडे करणारे एकूण 67 शेतकरी कुटुंब आढळून आले आहे. त्यांचे प्रमाण 34.54% असल्याचे दिसून येते. जे शेतकरी कुटुंब उत्पादित मालाची विक्री कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये करतात असे एकूण 87 शेतकरी कुटुंब आढळून आले त्यांचे प्रमाण 44.84% आहे. आपल्या उत्पादित मालाची विक्री खाजगी बाजारपेठेमध्ये करणारे एकूण 40 शेतकरी कुटुंब आढळून आले. त्यांचे प्रमाण 20.62% आहे. एकही आदिम कोलाम शेतकरी कुटुंब आपल्या उत्पादित मालाची विक्री आदिवासी विकास महामंडळामध्ये करताना दिसून येत नाही.

प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम शेतकरी कुटुंब आपल्या उत्पादित मालाचे विक्री प्रामुख्याने कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये करताना दिसून येते.




आलेख क्र. 1.11 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम शेतकरी कुटुंब उत्पादित मालाची विक्रीचे वर्गिकरण

**शेतीसाठी कर्ज**:-

आदिम कोलाम जमातीला आपल्या शेतामध्ये बी-बियाणांची खरेदी करणे, खते, कीटकनाशकांची खरेदी करणे यासोबतच शेतामध्ये लागणाऱ्या इतर कामाकरिता पैशाची आवश्यकता असल्याने शेती करण्याकरिता कर्ज घेतात. कोलाम शेतकरी कुटुंबामध्ये आपल्या शेतीकरिता कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण किती आहे यासंबंधीची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.12


आदिम कोलाम कुटुंब शेतीसाठी घेणाऱ्या कर्जासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | शेतीसाठी कर्जाबाबत प्रतिक्रिया | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | कर्ज घेणारे | 181 | 93.30 |
| 2 | कर्ज न घेणारे | 13 | 6.70 |
| एकुण | | 194 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.12 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम शेतकरी कुटुंब आपल्या शेतीसाठी कर्ज घेतात किंवा नाही याबाबत माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील प्राप्त माहितीनुसार कोलाम जमातीतील जे शेतकरी कुटुंब शेतीसाठी कर्ज घेतात असे एकूण 181 कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण 93.30% असल्याचे दिसून येते. तर जे कोलाम शेतकरी कुटुंब शेती करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे कर्ज घेत नाही असे एकूण 13 शेतकरी कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण 6.70% आहे.

वरील प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंब हे शेती करण्याकरिता प्रामुख्याने कर्ज घेताना दिसून येते.




आलेख क्र. 1.12 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंबातील शेतीच्या कर्जाचे वर्गिकरण

**कर्जाचा स्त्रोत**:-

वरील तक्ता क्रमांक 1.12 मध्ये दर्शविल्यानुसार एकूण 181 आदिम कोलाम शेतकरी कुटुंब हे शेती करिता कर्ज घेताना दिसून येते. आदिम कोलाम कुटुंब आपल्या शेतीसाठी कुठून कर्ज घेतात किंवा त्यांच्याकरिता कर्जाचा स्त्रोत काय आहे. यासंबंधी खालील तक्त्यामध्ये माहिती दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.13


आदिम कोलाम कुटुंबाचे शेतकरिता कर्जाच्या स्त्रोतासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | कर्जाचा स्त्रोत | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | सावकार | 143 | 79.01 |
| 2 | बँक | 25 | 13.81 |
| 3 | बचत गट | 7 | 3.87 |
| 4 | नातेवाईक | 6 | 3.31 |
| एकुण | | 181 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.13 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्जाचा पुरवठा कुठून होतो त्या स्त्रोतासंबधी माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील दर्शविलेल्या माहितीनुसार जे शेतकरी आपल्या शेतीसाठी सावकाराकडून कर्ज घेतात असे एकूण 143 कुटुंब आढळून आले ज्यांचे प्रमाण 79.01% आहे. तर ज्या कुटुंबांना शेती करिता कर्ज पुरवठा हा बँकेतर्फे होतो असे एकूण 25 कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण हे 13.81% दिसून येते. जे आदिम कोलाम शेतकरी बचत गटांकडून कर्ज घेतात असे एकूण 07 शेतकरी कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण 3.87% आहे. तर काही आदिम कोलाम शेतकरी कुटुंब हे आपल्या नातेवाईकाकडून शेती करिता कर्ज घेताना दिसून येते असे एकूण 06 शेतकरी कुटुंब असून त्यांचे प्रमाण 3.31% असल्याचे दिसून येते.

वरील प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की चंद्रपूर जिल्ह्यातील बहुतांश आदिम कोलाम शेतकरी कुटुंब हे सावकाराकडून कर्ज घेताना दिसून येते.




**आलेख क्र. 1.13 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंबातील शेतीच्या कर्जाच्या स्त्रोताचे वर्गिकरण**

## कर्जाची परतफेड:-

वरील तक्ता क्रमांक 1.13 मध्ये दर्शविल्यानुसार अध्ययन क्षेत्रातील एकुण 181 आदिम शेतकरी कुटुंब हे वेगवेगळ्या माध्यमातून शेती करिता कर्ज घेताना दिसून येते परंतु त्या आदिम कोलाम शेतकरी कुटुंबांनी कर्ज घेतलेले आहे. ते घेतलेले कर्ज ते नियमितपणे परतफेड करतात किंवा कसे याबाबत खालील तक्त्यामध्ये माहिती दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.14

आदिम कोलाम कुटुंब शेतीसाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेड बाबत माहिती दर्शविणारा तक्ता


| अ.क्र. | कर्जाची नियमित परतफेड | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | परतफेड करणारे | 166 | 91.71 |
| 2 | परतफेड न करणारे | 15 | 8.29 |

| | | |
|---|---|---|
| एकुण | 181 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.14 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील ज्या शेतकरी कुटुंबांनी शेतीसाठी कर्ज घेतलेले आहे त्या कर्जाची नियमित परतफेड करतात किंवा नाही याबाबत माहिती दर्शविण्यात आलेली आहे. अध्ययन क्षेत्रातील एकूण 181 आदिम शेतकरी कुटुंबांनी कर्ज घेतल्याचे दिसून येते. त्या 181 कुटुंबापैकी जे शेतकरी कुटुंब नियमितरीत्या घेतलेल्या कर्जाची परतफेड करतात असे 166 शेतकरी कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण हे 91.71% आहे. तर जे आदिम कोलाम शेतकरी कुटुंबे काही कारणामुळे उचललेल्या कर्जाची नियमितरीत्या परतफेड करू शकत नाही असे एकूण 15 शेतकरी कुटुंब दिसून आले. त्यांचे प्रमाण 8.29 % आढळून आले.

वरील प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील कर्जदार शेतकरी कुटुंब हे घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड करताना दिसून येते.




आलेख क्र. 1.14 चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम कुटुंबाच्या कर्जाच्या परतफेडीसंबंधी वर्गिकरण

**वन्य प्राण्यांपासून शेतीचे नुकसान:-**

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमात ही जंगली, डोंगराळ व दुर्गम भागामध्ये वास्तव्य करत असल्याने त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात वन्य प्रायांचा संचार दिसून येतो. ते वन्य प्राणी मोठ्या प्रमाणामध्ये शेतातील पिकांचे नुकसान करतात. आदिम कोलाम शेतकरी कुटंबांचे वन्यप्राण्यापासून होणाऱ्या शेतातील पिकांच्या नुकसानीसंबंधी खालील तक्त्यामध्ये माहिती दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 1.15

वन्यप्राण्यांपासून शेतपिकाच्या होणाऱ्या नुकसानीबाबत माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | प्रतिक्रिया | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 194 | 100 |
| 2 | नाही | 0 | 0 |
| एकुण | | 194 | 100 |


**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.15 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम शेतकरी कुटुंबातील शेतीचे वन्य प्राण्यापासून शेतातील पिकाचे होतात किंवा नाही याबाबत माहिती दर्शविण्यात आलेली आहे. अध्ययन क्षेत्रातील आदिम कोलाम जमातीतील एकूण 194 शेतकरी कुटुंबांपैकी ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्य प्राण्यापासून नुकसान होतात असे एकूण 194 शेतकरी कुटुंब आढळून आले असून त्यांचे प्रमाण हे 100% आहे. वन्य प्राण्यापासून ज्या आदिम कोलाम जमातीच्या शेतकरी कुटंबाच्या शेतातील पिकाचे नुकसान होत नाही असे एकही शेतकरी कुटुंब आढळून आलेले नाही.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P002

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Nov'25
Issue–XI(I), Volume–XIII

वरील प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील संपूर्ण शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान हे वन्य प्राण्यापासून होताना दिसून येते. ज्यामध्ये डुक्कर, नीलगाय, रोई अशा अनेक वन्य प्राण्यांपासून शेतातील पिकांचे नुकसान होत असल्याचे आढळते.




आलेख क्र. 1.15 आदिम कोलाम कुटुंबाच्या शेतीची वन्यप्राण्यापासून होणाऱ्या नुकसानीचे वर्गीकरण

**रासायनिक खतांचा वापर:-**

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंब हे जरी पारंपारिक पद्धतीने शेती करीत असेल तरीसुद्धा त्यांना आपल्या शेतीमध्ये जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त व्हावे याकरिता ते आपल्या शेतात रासायनिक खतांचा वापर करताना दिसून येते. त्यामुळे किती आदिम कोलाम शेतकरी कुटुंब आपल्या शेतामध्ये रासायनिक खतांचा वापर करतात त्याबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.


तक्ता क्र. 1.16
शेतामध्ये रासायनिक खताच्या वापराबाबत माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | प्रतिक्रिया | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 194 | 100 |
| 2 | नाही | 0 | 0 |
| एकुण | | 194 | 100 |

**स्त्रोत:- सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरुन**

वरील तक्ता क्रमांक 1.16 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील शेतकरी कुटुंब आपल्या शेतामध्ये रासायनिक खतांचा वापर करतात किंवा नाही याबाबतची माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील तक्त्यातील प्राप्त माहितीच्या अनुषंगाने एकूण 194 शेतकरी कुटुंबापैकी सर्वच 194 शेतकरी कुटुंब हे आपल्या शेतामध्ये रासायनिक खताचा वापर करताना दिसून येते त्यांचे प्रमाण हे 100% आहे. तर आपल्या शेतामध्ये रासायनिक खताचा वापर न करणारे एकही आदिम कोलाम शेतकरी कुटुंब आढळून येत नाही.

वरील प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम कुटुंबातील सर्वच शेतकरी कुटुंब हे आपल्या शेतामध्ये रासायनिक खतांचा वापर करताना दिसून येते.




आलेख क्र. 1.16 आदिम कोलाम कुटुंबाच्या शेतामध्ये वापरणाऱ्या रासायनिक खतांच्या माहितीचे वर्गीकरण

**परिणाम**

1. आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव आणि परंपरागत पद्धतींचा अवलंब यामुळे उत्पन्न मर्यादित राहते.
2. बहुतांश कोलाम कुटुंबांचे उत्पन्न अत्यल्प आहे, ज्यामुळे त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत.
3. शेतीच्या जमिनीपेक्षा दगडांचे प्रमाण जास्त असल्याने आणि कोरडवाहू शेतीमुळे उत्पन्न कमी आहे.
4. सिंचन सुविधांचा अभाव आणि डोंगराळ भागातील पाण्याची कमतरता यामुळे शेती उत्पन्नावर परिणाम होतो.
5. पूरक व्यवसायांचा अभाव हा आर्थिक स्थिरतेच्या दृष्टीने मोठी कमतरता आहे.

**निष्कर्ष**

1. आर्थिक मागासलेपण:- कोलाम जमातीच्या 82.38% कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न 50,000/- पेक्षा कमी आहे, ज्यामुळे त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. शिक्षणाचा अभाव आणि परंपरागत शेती पद्धती यामुळे त्यांचे राहणीमान खालावलेले आहे.
2. शेती आणि मजुरीवर अवलंबन:- शेती (50%) आणि मजुरी (49.48%) हे उत्पन्नाचे प्रमुख स्रोत असून, हंगामी स्वरूपामुळे उत्पन्न स्थिर नाही.
3. सिंचनाचा अभाव:- 71.13% कुटुंबांना सिंचन सुविधा नाही, ज्यामुळे शेती उत्पन्न मर्यादित राहते.
4. पूरक व्यवसायांचा अभाव:- 99.22% कुटुंबे कोणताही पूरक व्यवसाय करत नाहीत, ज्यामुळे आर्थिक स्थिरता निर्माण होत नाही.
5. कर्जाची समस्या:- 93.30% कुटुंबे कर्ज घेतात, त्यापैकी 79.01% सावकारांकडून उच्च व्याजदराने कर्ज घेतात, ज्यामुळे आर्थिक संकट वाढते.
6. वन्य प्राण्यांचे नुकसान:-: सर्व शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान वन्य प्राण्यांमुळे होते, ज्यामुळे उत्पन्नावर मोठा परिणाम होतो.

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिम कोलाम जमात आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागास आहे. त्यांचे उत्पन्न प्रामुख्याने परंपरागत शेती आणि मजुरीवर अवलंबून आहे, जे हंगामी आणि अस्थिर आहे. सिंचन सुविधांचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब नसणे, पूरक व्यवसायांचा अभाव, सावकारी कर्ज आणि वन्य प्राण्यांचे नुकसान यामुळे त्यांची आर्थिक स्थिती बिकट आहे. शेतीत रासायनिक खतांचा वापर होत असला तरी, आधुनिक अवजारे आणि तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे उत्पन्न वाढत नाही.

**शिफारशी**

1. कोलाम जमातीमध्ये शिक्षणाचा प्रसार करून आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि पूरक व्यवसायांचे प्रशिक्षण द्यावे.
2. डोंगराळ भागात लहान तलाव, विहिरी आणि पाणी साठवण प्रकल्प विकसित करावेत.

3. कुक्कुटपालन, पशुपालन, आणि बांबू उत्पादन यांसारख्या पूरक व्यवसायांना प्रोत्साहन द्यावे.
4. बँक आणि बचत गटांमार्फत कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करावे, जेणेकरून सावकारी कर्ज कमी होईल.
5. शेतांना कुंपण आणि वन्य प्राणी व्यवस्थापन उपाययोजना राबवाव्यात.
6. वनहक्क जमिनींचे पट्टे कोलाम कुटुंबांना त्वरित प्रदान करावेत.

**संदर्भ:-**

1. सर्वेक्षण डेटावरुन प्राथमिक आकडेवारी.
2. चंद्रपूर जिल्हा प्रशासन आणि आदिवासी विकास महामंडळ.
3- गोंड परधान आणि कोलाम . डॉ शैलजा देवगावकर .देवगावकर व डॉ .जी .एस .
4. महाराष्ट्रातील आदिवासी समाज जीवन- डॉदेविदास खोडेवाड .
5. आदिवासी समाजाचे समाजशास्त्र - डॉप्रदीप आगलावे .
6. बोधनकर सु व अलोणी वि. "सामाजिक संशोधन पध्दती" श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर चतुर्थ आवृत्ती
7. घाटोळे रा. ना. (2009), "समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती" श्री. मंगेश प्रकाशन नागपूर,
8. भांडारकर पु. ल. (1976), " सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ विद्या बुक्स औरंगाबाद
9. गारे गोविंद, "महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती" काम्टिनेन्टल प्रकाशन, विजनयनगर, पुणे
10. आवळे, म., (2015), शेतकसाठी शासकीय अर्थसाहाय्याच्या व अन्य विविध योजना-, चौधरी प्रकाधन पूणे
11. वैद्य, म., (2004), सेवाभावी व स्वयंसेवी संस्थासाठी अर्थसाहाय्याच्या 300 योजना, चौधरी पब्लिशर्स पुणे, प्रथम आवृत्ती